बुधवार, दि. १७ ऑगस्ट, २०२२

## आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला

## विषय – आठवणीतले प्रा. डॉ. एन. डी. पाटील

## वक्ते – मा. व्ही. वाय. (आबा) पाटील

## अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.
या उपक्रमातील पाचवे व्याख्यान मा. व्ही. वाय. (आबा) पाटील यांचे झाले. 'आठवणीतील प्रा. डॉ. एन. डी. पाटील' या विषयावर बोलताना मा. व्ही. वाय. आबा म्हणाले, ''प्रा. डॉ. एन.डी. पाटील हे ज्ञानाचे व अविचल तत्त्वनिष्ठेचे उपासक होते. अचाट स्मरणशक्ती आणि असीम धैर्याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड एन. डी. सरांच्या रोमारोमात भिनली होती. सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या आस्थेचा विषय होता. शेती, शेतकरी, उपेक्षितांच्या उन्नतीसाठी एनडी एन. डी. पाटील सर आयुष्यभर झटले." पुढे एन. डी. पाटील सरांची आठवण सांगताना ते पुढे म्हणाले, "एन. डी. पाटील नेहमी म्हणत, आयुष्यातील काही लढाया या आपण हरणार आहोत हे माहित असतानाही लढायच्या असतात. कारण काही लढाया जिंकण्यापेक्षा त्या कशासाठी व कोणत्या विषयासाठी लढल्या जातात हे महत्त्वाचे असते."

कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोगतात मा. जे. के. (बापू) जाधव म्हणाले, "एन.डी. पाटील यांचे सहकार क्षेत्रातील काम अद्वितीय आहे. एन. डी. पाटील यांनी हातात घेतलेल्या कामाचा शेवट केल्याशिवाय थांबले नाहीत. लोकांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी एन. डी. पाटील सरांनी केवळ जबर इच्छाशक्ती आणि पारदर्शक कार्यपद्धतीतून साध्य केल्या. शेतकऱ्यांपर्यंत सहकार चळवळीच्या रूपाने एन. डींनी पोहोचवला. एन. डी. पाटील हे हयातभर शेतीमालाच्या प्रश्नांसाठी, पाणीप्रश्नासाठी, वीजप्रश्नांसाठी सरकारबरोबर आयुष्यभर लढले. अशिक्षित लोकांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे हा त्यांचा आयुष्यभर कटाक्ष होता. त्यासाठीही रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ते हयातभर राबले. "

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम हे आपल्या मनोगतात म्हणाले, ''आज शेतकरी, कष्टकरी, शेतकरी श्रमजीवी लोकांवर अन्याय झाला तर त्यांच्यामागे उभे राहणारा कुणीही नेता नाही. प्रा. एन. डी. पाटील यांच्या रूपाने अशा वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक कृतिशील नेता मिळाला होता.'' सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. सतीश मस्के यांनी केला. आभार प्रा. दिलीप कोने यांनी मानले; तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व

**लाभार्थी :** 71

❒ क्षणचित्रे पुढील पानावर....

**विषय – आठवणीतले प्रा. डॉ. एन. डी. पाटील     वक्ते – मा. व्ही. वाय. (आबा) पाटील**

## काही क्षणचित्रे













विभागप्रमुख
मराठी विभाग

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.